संशोधन आराखडा

"बीड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य सेवा सुविधा : एक भौगोलिक अभ्यास"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

येथे भूगोल विषयातील पीएच.डी. पदवीसाठी
सादर करावयाचा संकल्पित संशोधन आराखडा

संशोधक
प्रा.डी.व्ही. झिंजुर्डे
(एम.ए., बी.एड्., नेट)
भूगोल विभाग
श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय,
सिरसाळा ता.परळी-वै. जि.बीड

मार्गदर्शक
प्रा.डॉ. जे.के. वाघमारे
भूगोल विभाग
सहाय्यक प्राध्यापक (एम.ए.,एम.फील., पीएच.डी.)
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर ता.चाकूर जि.लातूर

संशोधन केंद्र
श्री हवगी स्वामी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

सप्टेंबर - २०१७

"बीड जिल्ह्यातील आरोग्य सुविधा : एक भौगोलिक अभ्यास"

* प्रस्तावना :-

मानवी जीवनात आरोग्यास अनन्य साधारण महत्त्व आहे. आरोग्य ही व्यक्तिला मिळालेली सर्वात मोठी देणगी आहे. व्यक्तिला उत्तम रितीने जीवन जगण्यासाठी व तशी पात्रता येण्यासाठी शारीरिक निरोगीपणा अतिशय महत्त्वाचा आहे. निरोगी माणूस हाच खरा समाजाचा व राष्ट्राचा आधारस्तंभ आहे. मानवी आरोग्यावरच मानवाचा व राष्ट्राचा विकास अवलंबून आहे. आरोग्य चांगले नसेल तर व्यक्तिला शारीरिक व्याधी, मानसिक रोग जडून चिडचिडपणा, मानसिक संतूलन ढासळणे यासारख्या क्रिया घडत असतात.

आजच्या वैज्ञानिक प्रगतीच्या युगात मानवी जीवनात अमुलाग्र बदल झाला आहे. माणूस पैशाच्या मागे लागला आहे. भौतिक चंगळवादात तो रममान झाला आहे. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. म्हणून त्याचे शरीर विविध व्याधिंनी ग्रासून टाकले आहे. त्याचा परिणाम वैयक्तिक, कौटूंबिक, सामाजिक व अंतिमतः राष्ट्राच्या उन्नतीवर होत असतो.

आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो राष्ट्रातील शासन संस्थानी जतन करावा हे तत्त्व जगातील आरोग्य संघटनांनी मान्य केले आहे. परंतु निरामय, निरोगी जीवन वैद्याकडून प्राप्त करायची गोष्ट नसून ती स्वतः आत्मसात व प्राप्त करावयाची असते. आजारी पडणे वाईट, पण पडल्यास डॉक्टर, औषध, दवाखाने यांच्या पुरेशा सोयी असणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तिचे आरोग्य चांगले राखण्यासाठी भौगोलिक घटकांचीही आवश्यकता असते. प्रत्येक व्यक्तिला भरपूर सूर्यप्रकाश, शुध्द हवा, पाणी मिळणे आवश्यक आहे. तसेच वाईट सवयी, घाण व केरकचऱ्यापासून संरक्षण करणे फार गरजेचे असते. जर भौगोलिक घटक आरोग्यास पुरक असतील तर त्या ठिकाणच्या लोकांची बौध्दिक व शारीरिक क्षमता वाढते व तो प्रदेश विकसीत होतो.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर (१९४७) विविध क्षेत्रात प्रगती झाली आहे. १९४६ च्या भोर कमेटीच्या अहवालावरून आरोग्याच्या विविध समस्या व त्यांच्या निवारणाकडे आरोग्य विभागाचे लक्ष वेधल्या गेले. भारतात सर्वव्यापी आरोग्य सेवा व संघराज्य क्षेत्र याकडून

पुरवली जाते. भारतीय संविधानात "लोकांचे पोषण व राहणीमान वाढवणे तसेच लोकांचे आरोग्य सुधारणे ही राज्यांची मूळ जबाबदारी आहे" असे म्हटले आहे. भारत हा खेड्यांचा देश असून सार्वजनिक आरोग्य सेवा हा ग्रामीण भागासाठी वरदान ठरला आहे. १९५८ पासून आरोग्य सुविधांचा पुरवठा "प्राथमिक आरोग्य केंद्र" स्थापून केला जाऊ लागला आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत लोकांच्या दरडोई उत्पादनात वाढ करणे हा उद्देश ठेवून कुटुंब कल्याण कार्यक्रम, जननी सूरक्षा योजना, सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम, प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, सुधारित क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय अंधत्व, कुष्ठरोग, हिवताप, हत्तीरोग, मेंदूज्वर, चिकनगुनिया इत्यादी रोगांच्या नियंत्रणासाठी देशभर कार्यक्रम राबवले जातात.

महाराष्ट्रामध्ये आरोग्य सुविधांच्या बाबतीत प्रगती ही समाधानकारक आहे. केरळ, तामिळनाडु, कर्नाटक, पंजाब हे राज्य सोडली तर बाकी सर्व राज्य आरोग्य व आरोग्य सुविधांच्या बाबतीत महाराष्ट्राच्या मागे आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये त्रिस्तरीय आरोग्य सुविधा असून ग्रामीण व नागरी भागात सामाईक आरोग्य केंद्रे(४५८), प्राथमिक आरोग्य केंद्रे (१०१६), उपकेंद्रे (१०५८०), ग्रामीण रुग्णालये/कुटीर रुग्णालये (३८६), उपजिल्हा रुग्णालये (८२) असून नागरी भागातही जिल्हा रुग्णालये (२३) मल्टि स्पेशालिटी रुग्णालये व वैद्यकिय महाविद्यालये आहेत. विभागानुसार पाहिल्यास पश्चिम महाराष्ट्र व कोकणात आरोग्य सुविधा अधिक आहेत तर त्या खालोखाल मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्र असा क्रम आहे. यापैकी मराठवाडा या विभागात बीड जिल्ह्याचा अंतरभाव होतो.

बीड जिल्ह्यामध्ये आरोग्य सुविधा उपलब्ध आहेत. परंतु जिल्ह्यामध्ये शासकीय रुग्णालये-१, उपविभागीय रुग्णालय-२, प्राथमिक आरोग्य केंद्रे ५० आहेत. अंबाजोगाई येथे स्वा.रा.तीर्थ ग्रामीण आरोग्य महाविद्यालय हे आशिया खंडातील सर्वात मोठे ग्रामीण रुग्णालय आहे. तरी देखील वाढती लोकसंख्यामुळे आरोग्य सुविधांवरती ताण पडत आहे व जिल्ह्यातील लोकांचे आरोग्य खालावून जिल्ह्याचा विकास खुंटत आहे. जिल्ह्यातील लोकांचे आरोग्य सुधारून त्यांचे दरडोई उत्पन्न वाढण्यासाठी व आरोग्य सुविधांच्या समस्या की करण्यासाठी तसेच त्यातल दोष निवारण्यासाठी प्रस्तूत संशोधन अभ्यास विषयाची निवड केली आहे.

* संशोधनाचे महत्त्व :-

"आरोगय हिच संपत्ती" असे म्हटले जाते. कारण जीवनात स्वस्थ्य नसेल तर आपण कोणत्याच मौल्यवान गोष्टीचा उपयोग करु शकत नाही. एखाद्या रुग्णाच्या समोर मौल्यवान संपत्ती व आरोग्य अशा दोन गोष्टी ठेवल्या तर तो निश्चित आरोग्याचीच निवड करील. विकासाच्या केंद्रस्थानी जनतेला ठेवून "मानव विकास" ही संकल्पना उदयास आली आहे. मानवी विकास मोजण्यासाठी मानव विकास निर्देशांक उपयोगात आणला जातो. त्यात उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य या तीन घटकांना महत्त्व दिले जाते. म्हणून मानव विकास निर्देशांकानुसार विकास करावयाचा असेल तर व्यक्तिच्या उत्पन्न व शिक्षणासोबतच त्याच्या आरोग्याकडे तेवढेच लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

* संशोधन समस्या :-

जगाचा विचार केला तर भारतात मोठ्या प्रमाणावर आरोग्य व्यवस्थेत अनागोंदी आहे. वैद्यकीय शिक्षण, वैद्यकीय सेवा, औषध गुणवत्ता, नियंत्रण पॅरामेडिकल सेवा वगैरे अनेक क्षेत्रात समस्या आहेत. देशातील वेगवेगळ्या प्रांतात कमी अधिक प्रमाणात अशीच अवस्था आहे. हे आव्हान पेलून या सुधारणा करणे गरजेचे आहे.

* आरोग्य संकल्पना :-

आरोग्य ही संकल्पना अत्यंत व्यापक अर्थाने उपयोगात आणली जाते. आरोग्य म्हणजे 'शारीरिक स्वास्थ्य' किंवा 'शरीरातील इंद्रियांची कार्यक्षमता' होय. स्थूल मानाने शारीरिक, मानसिक, सामाजिक संतूलनाची स्थिती म्हणजे आरोग्य होय.' आरोग्य म्हणजे निरोगीपणा हा विचार अपुरा आहे. एखाद्या व्यक्तीस जीवन सर्वोत्तम रितीने जगण्यास किंवा चांगल्या रितीने सेवा करण्यास जीवनाच्या ज्या गुणांची अंगी पात्रता व क्षमता येते त्यास आरोग्य म्हणतात. आरोग्य म्हणजे काय हे पुढील काही व्याख्यावरुन स्पष्ट होईल.

१) जे.एफ. विल्यम्स (J. F. Williams)

'Health is a qullity of life which enables the individual to give long and serve best.'

२)	**जागतिक आरोग्य संघटना (WHO)**

"शारीरिक, मानसिक व सामाजिक सुस्थिती म्हणजे आरोग्य किंवा स्वास्थ्य होय." स्वास्थ्य म्हणजे स्वस्थता, म्हणजेच आपली जी सहज व नैसर्गिक स्थिती आहे त्या स्थितीत राहणे. अर्थात स्वच्छंदी, सुख व आनंदी जीवन जगणे होय.

३)	**मरे बेकर** यांच्या मते, "आरोग्य, वस्तु अवस्था नसून मानसिक अवस्था आहे."

४)	**वेबस्टर** यांच्या मते, "स्वस्थ म्हणजे शरीर आणि मनाची स्थिती मजबूत असणे म्हणजे मनुष्य हा शारीरिक रोग किंवा व्याधींपासून पूर्णपणे मुक्त असणे."

*	**अभ्यास क्षेत्राची ओळख :-**

बीड जिल्हा हा महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील मध्य भागात वसलेला असून त्याच अक्षवृत्तीय विस्तार १८° २७' ते १९° २७' उ.अक्षवृत्त व ७४° ४९' ते ७६° ४४' पूर्व रेखावृत्तामध्ये आहे. हा जिल्हा औरंगाबाद व जालना जिल्ह्याच्या उत्तरेकडे परभणी जिल्ह्याच्या आग्नेयला, लातूर जिल्ह्याच्या ईशान्येला व उस्मानाबाद जिल्ह्याच्या पश्चिमेला पसरलेला आहे. बीड जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०,६९२ चौ.कि.मी. आहे. बीड जिल्ह्याची २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ३३,५६,५६६ आहे. लोकसंख्येची घनता दर चौ.कि.मी. ला २०२ आहे. बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुक्यांचा समावेश आहे. ते म्हणजे बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी, शिरुर कासार, अंबाजोगाई, माजलगांव, केज, धारुर, परळी व वडवणी होय. बीड जिल्ह्यात एकूण १३६५ गावे आहेत. महाराष्ट्र पठारावरील बीड जिल्हा हा एक महत्त्वाचे स्थान म्हणून ओळखला जातो. भौगोलिक व प्राकृतिकरित्या जिल्ह्याने तीन विभागात विभाजन केले जाते. जिल्ह्याच्या उत्तरेकडील भाग गोदावरीच्या खोऱ्याने व्यापला आहे. मध्यवर्ती भाग बालाघाट पठाराने (डोंगररांगांनी) व्यापलेला आहे. जिल्ह्याचा पश्चिम भाग व विशेष करुन आष्टी तालुका सिंधफणा नदीच्या खोऱ्याने व्यापलेला आहे. बीड जिल्ह्याचे हवामान सर्वधारणपणे उष्ण व कोरडे आहे. जिल्ह्यात सरासरी ७५० मी.मी. पाऊस पडतो. बीड जिल्ह्यात तीन प्रकारच्या मृदा आढळतात. गोदावरी, सिंधफणा, सिना व मांजरा नदीच्या किनाऱ्यावर क्षारयुत मृदा आढळते. कापसाची काळी मृदा ही गेवराई, माजलगांव, धारूर व

वडवणी तालुक्यामध्ये आढळते आणि जिल्ह्याच्या मध्यवर्ती भागात व विशेष करून बालाघाट डोंगररांगामध्ये लाल मृदा व खडकाळ मृदा आढळते.

या सर्व प्राकृतिक घटकांचा परिणाम हा बीड जिल्ह्यातील आरोग्य सुविधांवर पडलेला दिसून येतो. त्यामुळेच हा जिल्हा प्रस्तूत संशोधन अभ्यासासाठी निवडला आहे.

*** संशोधनाचे उद्देश :-**

१) आरोग्य विषयक शासकीय सेवा सुविधांचे मानवी जीवनातील महत्त्व जाणून घेणे.

२) बीड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य सुविधांचा अभ्यास करणे.

३) बीड जिल्ह्यातील तालुकानिहाय शासकीय आरोग्य सुविधांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४) बीड जिल्ह्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात आरोग्य विषयक शासकीय सेवासुविधांचे मूल्यमापन करणे.

५) बीड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य सेवासुविधा विषयक शासनाचे धोरण अभ्यासणे.

६) आरोग्य विषयक सेवा सुविधांचा अभ्यास करून उपाययोजना सूचविणे.

७) मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

८) आरोग्य विषयक सुविधांचा जिल्ह्यातील मानवी जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

*** संशोधनाची गृहितके :-**

१) जिल्ह्यातील आरोग्य सुविधा लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशा नाहीत.

२) भौगोलिक घटक मानवी आरोग्याला प्रभावित करीत असतात.

३) जिल्ह्यामध्ये आरोग्य केंद्राचे विषम वितरण आहे.

४) आरोग्य विषयक शासकिय योजनांची अमलबजावणी सदोष आहे.

५) आरोग्यावर आर्थिक स्थितीचा परिणाम होतो.

६) जिल्ह्यातील शासकीय आरोग्य सेवासुविधा सर्वत्र सारख्या नाहीत.

७) जिल्ह्यातील आरोग्य सेवा सुविधांचा जिल्ह्याच्या विकासावर परिणाम होतो.

* **संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक सामग्रीचा आधार घेण्यात येणार आहे. प्राथमिक सामग्रीसाठी प्रश्नावली, प्रत्यक्ष मुलाखतीच्या आधारे माहिती मिळविली जाणार आहे. द्वितीयक सामग्रीसाठी महाराष्ट्र सरकारचे जिल्हानिहाय दशवार्षिक अहवाल, विभागीय सांख्यिकीय कार्यालयाची माहिती, जिल्ह्यांचे सामाजिक व आर्थिक समालोचन (वार्षिक अहवाल) विविध प्रकारचे मासिके, साप्ताहिके, शासकीस प्रकाशन, वर्तमानपत्रातील लेख तसेच इतर प्रकाशित व अप्रकाशित माहितीचा आधार घेतला जाणार आहे.

आरोग्य विषयक सुविधांचा अभ्यास करण्यासाठी जिल्ह्यातील निवडक आरोग्य केंद्राची निवड करून तेथील आरोग्य सुविधांची व रुग्णांची स्थिती अभ्यासण्यात येणार आहे. उपलब्ध प्राथमिक व द्वितीयक सामग्रीवर प्रक्रिया करण्यासाठी गणितीय माध्य, गुणोत्तर वृध्दीदर इत्यादी सारख्या सांख्यिकीय साधनांचा आवश्यकतेप्रमाणे वापर करण्यात येणार आहे. या प्रक्रियायुक्त आधार सामग्रीचे तुलनात्मक सखोल अभ्यास करताना सुक्ष्म विश्लेषण पध्दती आणि स्थुल विश्लेषण यांच्या आवश्यकतेप्रमाणे उपयोग करून निष्कर्ष काढण्यात येणार आहेत.

* **संशोधन साहित्याचा आढावा :-**

१. डॉ.देवेंद्रकुमार नायक यांनी Spatial Patterns of Health Care in the Khasi Hills of Meghalaya या शोधप्रबंधातून भारताच्या इशान्य भागातील खासी टेकड्यांच्या परिसरातील आरोग्य सुविधांचा शोध घेतला आहे.

२. डॉ.एम.पी.मानकरी यांनी "बिदर व धारवाड या दोन् जिल्ह्यातील आरोग्यविषयक सेवांच्या वितरणांचा तुलनात्मक अभ्यास" A comparative Geographical Analysis Study of Health Care Facilities in Bidar and Dharwad Districts या शोधप्रबंधातून घेतला आहे.

३. डॉ.लांजेवाड एच.डी. या संशोधकाने "गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे आरोग्य व मानवी आजार : एक वैद्यकीय भूगोल" या विषयातून आदिवासींच्या आरोग्याचा शोध घेतला आहे.

४. डॉ.विरकपाळे एस.एन. यांनी "उस्मानाबाद जिल्ह्यातील आरोग्य केंद्र व मानवी आजार यांचा भौगोलिक अभ्यास" या विषयात संशोधन केले आहे व मानवी आरोग्यावर भौगोलिक पर्यावरणातील घटकांचा कसा प्रभाव पडतो याचा शोध घेतला आहे.

५. डॉ.विजय बैसाने यांनी "औरंगाबाद जिल्ह्यातील आरोग्यविषयक सुविधांचा भौगोलिक अभ्यास" या विषयावर संशोधन करून औरंगाबाद जिल्ह्यातील आरोग्यविषयक सेवासुविधांचा आढावा घेतला आहे.

* प्रकरण योजना / मांडणी :-

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये ९ प्रकरणे मांडण्यात येणार आहेत. ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) प्रस्तावना

- १.१ - आरोग्य म्हणजे काय ?
- १.२ - आरोग्य भूगोलाची स्वरूप व व्याप्ती
- १.३ - आरोग्य भूगोलाचा विकास
- १.४ - आरोग्य भूगोलाचे महत्त्व
- १.५ - आरोग्यावर परिणाम करणारे घटक
- १.६ - आरोग्य सुविधा
- १.७ - गृहितके
- १.८ - उद्दिष्टये
- १.९ - संबंधित साहित्याचा आढावा
- १.१० - संशोधन पध्दती
- १.११ - प्रकरण योजना

२) अभ्यास क्षेत्रातील भौगोलिक, सामाजिक, आर्थिक घटकांचा अभ्यास

- २.१ - प्रस्तावना
- २.२ - ऐतिहासिक पार्श्वभूमी
- २.३ - स्थान व विस्तार

२.४ - आकार

२.५ - सीमा

२.६ - भूपृष्ठ रचना

२.७ - नदी प्रणाली

२.८ - हवामान

२.९ - मृदा

२.१० - वनस्पती

२.११ - पशुधन

२.१२ - कृषी

२.१३ - उद्योग

२.१४ - लोकसंख्या

२.१५ - वाहतुक व दळणवळण

२.१६ - राजकीय स्थिती

३) शासकीय आरोग्य सेवासुविधाविषयी शासनाची भूमिका

३.१ - जागतिक पातळीवरील आरोग्य सुविधाविषयक धोरणे

३.२ - भारतातील शासकीय आरोग्य सेवा सुविधा

३.३ - महाराष्ट्रातील शासकीय आरोग्य सेवा सुविधा

३.४ - बीड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य सेवा सुविधा

३.५ - शासनाचे निर्णय

३.६ - विविध योजनांचा अभ्यास

४) बीड जिल्ह्यातील शासकीय आरोग्य सेवा सुविधांचा अभ्यास

४.१ - तालुकानिहाय शासकीय आरोग्य सेवा सुविधांचा अभ्यास

४.२ - कालसापेक्ष आरोग्य सेवासुविधांचा अभ्यास (१९९१ ते २०१७)

४.३ - विविध सेवांचा क्रम

४.४ - मनूष्यबळ

४.५ - औषध पुरवठा

४.६ - भौतिक सुविधा

४.७ - रोगनिहाय सेवासुविधा

५) अभ्यास क्षेत्रातील आरोग्यावर परिणाम करणारे नैसर्गिक व सांस्कृतिक घटक

५.१ - नैसर्गिक घटक

५.१.१ - हवा

५.१.२ - पाणी

५.१.३ - मृदा

५.१.४ - प्राकृतिक रचना

५.२ - सांस्कृतिक घटक

५.२.१ - शासकीय धोरण

५.२.२ - पिण्याची पाण्याची व्यवस्था

५.२.३ - कचरा विल्हेवाट

५.२.४ - घाण पाणी

५.२.५ - नाल्या सफाई

५.२.६ - शौचालयाचा अभाव

५.२.७ - व्यसनाधिनता

५.२.८ - अज्ञान

५.२.९ - अंधश्रध्दा

६) अभ्यास क्षेत्रातील शासकीय आरोग्य विषयक सेवा सुविधा संदर्भातील समस्यांचा अभ्यास

६.१ - मनुष्यबळाविषयी समस्या

६.२ - औषध उपलब्धता समस्या

६.३ - खाटाची समस्या

६.४ - वेगवेगळ्या पातळीवरील आरोग्य केंद्रांची समस्या

६.५ - लोकांना मिळणाऱ्या सेवा संदर्भातील समस्या

६.६ - शासकीय आरोग्य सेवा सुविधाविषयी नागरीकांतील गैरसमज

६.७ - स्वच्छतेची समस्या

७) बीड जिल्ह्यातील लोकसंख्या अभ्यास

७.१ - एकूण लोकसंख्या

७.२ - लिंगरचना

७.३ - घनता

७.४ - जन्म व मृत्यू दर

७.५ - लोकसंख्या वाढीचे परिणाम

७.६ - साक्षरता

७.७ - कुटूंबनियोजन

८) क्षेत्र अभ्यास व अभ्यास क्षेत्रातील विविध कालावधी व होणारे संभाव्य आजार

८.१ - मुलाखती

८.१.१ - रुग्णांच्या मुलाखती

८.१.२ - आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मुलाखती

८.२ - पावसाळ्यातील आजार

८.३ - हिवाळ्यातील आजार

८.४ - उन्हाळ्यातील आजार

९) निष्कर्ष व उपाययोजना

* संदर्भ ग्रंथ सूची

१) आर्थिक व सामाजिक समालोचन : बीड जिल्हा

२) संशोधन पध्दती व तंत्रे - डॉ.प्रदिप आगलावे

३) सामाजिक संशोधन पध्दती - डॉ.पु.ल. भांडारकर

४) भूगोल शास्त्रातील संशोधन पध्दती, डॉ.श्रीकांत कार्लेकर

५)	आरोगय विद्या, डॉ.शाम आष्टेकर

६)	आरोग्य शिक्षण, प्रा.के.एन. गदगे, प्रा.मास्तळे

७)	स्वस्थ आणि योग - प्रा.मेहनकुमार सरपाते खडकीकर

८)	महाराष्ट्राची आर्थिक पहाणी-२०१०-११

९)	आपण व आपले आरोग्य - डॉ.वि.ना.भावे, डॉ.देवदास, डॉ.भावे (गो.य.राणे, प्रकाशन,पुणे)

१०)	आरोग्य शिक्षण मार्गदर्शिका (२००७), नलिनी प्रकाशन, नागपूर

११)	Health and Physical Fitness - Merley William P.

१२)	Health and Physical Education - Rajendra Singh

१३)	Medical Geography, Majid Husain, Anmol Publication, New Delhi

१४)	Geo Metrical Environment and Health Care, Agnihotri R.C., Rawat Publication, Jaipur

१५)	Internet Websites

***

संशोधक

प्रा.डी.व्ही. झिंजुर्डे
(एम.ए., बी.एड्., नेट)
भूगोल विभाग
श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय,
सिरसाळा ता.परळी-वै. जि.बीड

मार्गदर्शक

प्रा.डॉ. जे.के. वाघमारे
भूगोल विभाग
सहाय्यक प्राध्यापक (एम.ए.,एम.फील., पीएच.डी.)
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय,
चाकूर ता.चाकूर जि.लातूर